# ठाणेनगर वाहतूक उप विभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना

महाराष्ट्र पोलीस
सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वावि/वाहतूक अधिसूचना/ २०२ /२०२४ दि. १८ /१०/२०२४

## –: वाहतूक नियंत्रण अधिसुचना :–

**ज्याअर्थी, ठाणेनगर** वाहतूक उप विभागाच्या हद्दीत दि. २९/१०/२०२४ ते दि. ०३/११/२०२४ या कालावधीत **'दिपावली'** सण साजरा होणार आहे. ठाणेनगर हद्दीत प्राचीन काळापासून मोठी बाजारपेठ असून सदर ठिकाणी दिपावली सणाच्या निमित्ताने मोठया प्रमाणात खरेदीसाठी लोकांची गर्दी होत असते. सदर परिसरात वाहतूक कोंडी होवू नये, वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी, मी पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर म्हणून,** महाराष्ट्र शासन गृहविभाग एम.व्ही.ए.–११६/सी.आर/३७/टी.आर. दि.०७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१)(अ)(ब) अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून वाहतूक नियंत्रण अधिसूचना जारी करीत आहे.

**प्रवेश बंद –** १) जांभळी नाका कडून बाजारपेठेत जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **जांभळी नाका** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने जांभळी नाका येथून उजवीकडे वळून टॉवर नाका मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** २) खारकर आळी कडून बाजारपेठ जांभळी नाका कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **महाजनवाडी हॉल** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने खारकर आळी कडून येवून ठा.म.पा. व्यायामशाळा येथून महाजनवाडी हॉल लगत उजवे वळण घेवून एन. के.टी. कॉलेज कडून कोर्ट नाका मार्गे इच्छित स्थळी जातील

**प्रवेश बंद –** ३) ठाणे ट्रेडर्स दुकानाकडून महंमद अली रोडने जांभळी नाका कडे जाणाऱ्या मोटारसायकल वगळून सर्व प्रकारच्या वाहनांना **ठाणे ट्रेडर्स दुकानाजवळ 'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने ठाणे ट्रेडर्स दुकानाकडून उजवीकडे वळून महागिरी मस्जिद कडून वळून इच्छीत स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ४) दादोजी कोंडदेव स्टेडीयम कडून बाजारपेठ कडे जाणा–या सर्व प्रकारच्या वाहनांना **जवाहर बाग, अग्निशमन केंद्र** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने जवाहर बाग, अग्निशमन केंद्र कडून राघोबा शंकर रोड मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ५) अशोक सिनेमा व नॅशनल इलेक्ट्रॉनिक्स कडून बाजारपेठेत जाणाऱ्या मोटारसायकल वगळून सर्व प्रकारच्या वाहनांना **माटे चौक** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने नॅशनल इलेक्ट्रॉनिक्स येथून उजवीकडे वळून दत्त मंदिर कडून सिडको स्टॅण्ड मार्गे इच्छित स्थळी जातील.

सदर अधिसूचना दि. २५/१०/२०२४ ते दि. ०३/११/२०२४ रोजीपर्यंत दररोज दुपारी १४.०० ते रात्रौ २३.०० वाजेपावेतो अंमलात राहील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रूग्णवाहिका व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

( पंकज शिरसाट )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे
२/– सदर अधिसूचना राजपत्रात प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

CamScanner

<u>प्रत माहितीसाठी  सविनय सादर,</u>
मा. पोलीस आयुकत, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुकत, ठाणे शहर
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे
मा. जिल्हाधिकारी, ठाणे

<u>प्रत कार्यवाहीसाठी</u> :-
उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे
परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालिका, ठाणे
विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, ठाणे
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ १, ठाणे व  विशेष शाखा, ठाणे शहर
सपोआ, ठाणे वाहतूक विभाग व पोलीस निरीक्षक ठाणेनगर, राबोडी, नौपाडा वाहतूक उप विभाग, ठाणे शहर

<u>प्रत</u> :- पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर
२/- सदर अधिसूचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

<u>प्रत</u> :- समन्वय अधिकारी, ९ ए.एस. कक्ष, ठाणे
२/- सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी

CamScanner

# THANENAGAR TRAFFIC UNIT




CamScanner